# सुर्यासमोर काजवा

## गांधीहत्येचा इतिहास



चुनीभाई वैद्य

महात्मा गांधीजींची हत्या हा भारताच्या इतिहासातील एक न धुता येणारा कलंक आहे. जगातील सर्व नेत्यांना दीपस्तंभाप्रमाणे असणाऱ्या या अलौकिक नेत्याची हत्या एका भारतीयानेच करावी याहून मोठा दैवदुर्विलास तो काय! या हत्येमागच्या पार्श्वभूमीची चर्चा करणारी ही छोटी पुस्तिका.

मणीभवन गांधी संग्रहालयाने हे पुस्तक विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. हे पुस्तक जास्तीत जास्त लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवण्यासाठी आपण मदत कराल अशी अपेक्षा आहे..

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

साहित्य प्रतिष्ठान

# सूर्यासमोर काजवा

(गांधीजींचे बलिदान - सत्य काय आणि असत्य काय ?)

चुनीभाई वैद्य

अनुवादक - मेघश्याम तु. आजगांवकर

# ''सूर्यासमोर काजवा''

(गांधीजींचे बलिदान - सत्य काय ? असत्य काय ?)

मूळ गुजराती : सूरज सामे धूळ

(गांधीनुं बलिदान अने साचुं शुं खोटुं शुं)

**प्रकाशन :**

२ ऑक्टोबर १९९८

**द्वितीय आवृत्ती**

**मूल्य :** ऐच्छिक

**प्रकाशक :**

मणिभवन गांधी संग्रहालय,

१९, लेबरनम रोड, गांवदेवी,

मुंबई - ४०० ००७.

**मुद्रक :**

प्रकूल इन्टरप्रायझेस

१५, शांताराम चाळ,

२८/५४, तात्या घारपुरे पथ, मुगभाट,

गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

# मनोगत

महात्मा गांधी आणि त्यांच्या विचारांविषयी अनेक गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न अनेक दिवसांपासून होत आहेत. पण गेल्या कांही दिवसांपासून देशाच्या विभाजनाकरितांसुद्धा त्यांनाच जबाबदार मानून त्यांना 'राष्ट्रपिता' नव्हे तर ''देशद्रोही'' ठरविण्याचा व त्यांच्या हत्येला हत्या नव्हे तर वध मानून त्यांच्या विरूद्ध भयंकर अपप्रचाराचे षड्यंत्र रचण्यात आले आहे. त्यांना महापापी मानून impeachment करावयाचा प्रयत्न करण्यांत येत आहे. या षडयंत्राचा शेवटचा प्रयत्न म्हणजे ''मी नथूराम गोडसे बोलतोय'' हे नाटक ज्यांत नाटककाराने अत्यंत सहानुभूतिपूर्वक म्हणा किंवा भक्तिपूर्वक दृष्टीने म्हणा, पण गोडसेचे मनोगत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्याविरूद्ध गांधीजींचा बचाव करण्याची आवश्यकता नाही, कारण सत्यपंथी गांधीजींना त्याची गरजच नाही. परंतु गांधीजींच्या कित्येक अनुयायांना आणि त्यांतही अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा पूर्णपणे स्विकार करणाऱ्या अनुयायांनाहि वाटते की नाटकांत इतिहासाला ज्या रितीने विकृत स्वरूपांत मांडण्यात आले आहे त्याला विरोध करून सत्य घटना (facts) लोकांसमोर ठेवल्या नाहीत तर आपण दोषी ठरू. मुंबईत व महाराष्ट्रांत अनेक इतिहासकारांनी आणि विद्वानांनी असे प्रयत्न केले आहेत ज्यांत डॉ. वाय. डी. फडके आणि न्यायमूर्ति धर्माधिकारींचा प्रामुख्याने उल्लेख करांवा लागेल.

नाटककार आणि त्यांच्या साथीदारांनी एक प्रचार असाही केला की या नाटकाचें गुजराथी भाषेंत चाळीस पेक्षा अधिक प्रयोग झाले. पण एकासुद्धा गुजराथी माणसानें त्याला विरोध केला नाही. हे प्रयोग कोठे झाले, केव्हा झाले हे कुणालाच ठाऊक नाही. जे काय असेल ते असो पण गुजरातचे ज्येष्ठ आणि सन्निष्ठ सर्वोदयवादी श्री. चुनिभाई वैद्य यांनी ''सूरज सामे धूळ'' ही छोटीशी पुस्तिका लिहून गुजरातला दोषमुक्त करण्याचा प्रशंसनिय प्रयत्न केला. यांत त्यांनी सत्य घटना (facts) मांडण्याचा प्रयत्न केलेलाच आहे शिवाय तो मुलाखतीच्या स्वरूपांत असल्याने माहितीपूर्ण, रसप्रद आणि आकर्षक

सुद्धा झालेला आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे या पुस्तिकेच्या प्रथम आवृत्तीच्या १०,००० प्रति संपल्या असून द्वितीय आवृत्ती ७,००० प्रतींची निघत आहे.

माझ्या हातांत ही पुस्तिका येतांच मी वाचली आणि त्वरितच त्याचा मराठी अनुवाद करण्याचा निर्णय घेतला. अनुवाद करावयाचा होताच पण तो अगदी त्वरेने करावयाचा होता. मणिभवन मधील सहकारी श्री. आजगांवकर यांच्याशी मी त्याबाबत बोलले. आमचा निर्णय त्यांनी स्विकृत केला, एवढेच नव्हे तर अनुवाद करण्याचीहि इच्छा प्रकट केली. आणि दोन दिवसांत भाषांतर पूर्ण करून दिले, तेसुद्धा चुनिभाईसारखेच सोप्या सरळ भाषेत.

चुनिभाईनी त्यांच्या पुस्तिकेच्या भाषांतराची परवानगी दिली आणि आजगांवकरांनी त्याचा अनुवाद त्वरेने केला म्हणून त्या दोघांचे तसेच श्री. बकुल राऊत यांनी पुस्तिका त्वरित गतीने छापून दिली म्हणून त्यांचे आम्ही ऋणी आहोत. या पुस्तिकेद्वारे मराठी भाषिकांच्या मनांतून गांधीजींविषयीच्या गैरसमजूती थोड्या प्रमाणात जरी दूर झाल्या तरी गांधीजींचे ऋण अल्प प्रमाणांत फेडण्याचा हा प्रयत्न सार्थकी लागला असे आम्ही मानूं.

२१-९-१९९८

**उषा महेता**
अध्यक्षा
**मणिभवन गांधी संग्रहालय**
**आणि**
**मुंबई गांधी स्मारक निधी**

# पुस्तकातील मुद्दे

१) अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य आणि त्याची मर्यादा - गोडसेला खूनाचा अधिकार देणारे तसेच समाजात वैरभाव पसरवणारे नाटक प्रतिबंधित करण्याचा सरकारला आणि समाजाला हक्क नाही कां ? हा कुठला न्याय ?

२) गांधी हत्येचे प्रयत्न (घटना-क्रम).

३) दंड केवळ सरकार करू शकते, अन्य कोणी नाही.

४) खूनाची कारणे संपूर्ण खोटी - ही कारणे नव्हती तेव्हा खूनाचें प्रयत्न कां केले गेले ?

५) मुस्लिमांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहांत आणण्याचे प्रयत्न फार पूर्वीपासून चालू होते - हिंदुत्ववादी नेत्यांची त्यातील भूमिका.

६) वेगवेगळे मतदार संघ, मुस्लिमांना त्यांच्या संख्येनुसार प्रतिनिधित्व देण्याची हिंदुत्ववाद्यांची भूमिका - गांधी नंतर आले.

७) पाकिस्तान निर्मितीची संकल्पना - हिदुत्ववादी चळवळीचे उतावळे समर्थन.

८) गांधीजींची ईश्वर - परायणता, धार्मिकता, व्यापक मानवधर्म.

९) मुस्लिमांना जवळ आणण्याची आणि दूर लोटण्याची प्रक्रिया.

१०) गांधीजींची ऐक्याची प्रक्रिया - हिंदुत्ववाद्यांची भेदभावाची प्रक्रिया.

११) गोबेल्सची शिकवण - खोटे शेकडो वेळां पुन्हां पुन्हां सांगितल्यास लोक ते सत्य मानतात. त्याच पद्धतीने गांधीजी आणि काँग्रेसला बदनाम करण्याचे प्रयत्न.

१२) राष्ट्रवादी मुस्लिम आणि काँग्रेस

१३) जैसे थे परिस्थिति ठेऊन चालते होण्याची माऊन्टबेटनची धमकी. काँग्रेसमध्ये चलबिचल.

१४) फसविले गेल्याच्या भूमिकेत गांधीजी - असाध्य परिस्थितित विभाजनाचा स्विकार - इतरांनी गांधीजींना साथ का दिली नाही - समजण्या पलिकडली हिंदुत्ववाद्यांची भूमिका.

१५) पंचावन्न कोटी - ''शंठ प्रति शाठ्यं'' नीतिचा अविष्कार - नैतिकतेचा व्यापक प्रभाव.

१६) हत्येपाठी कोण होते ? कसे ? गांधीजींचा प्रभाव साऱ्या देशावर - कशामुळे ?

१७) हत्येचे षढयंत्र हिंदुत्ववाद्यांनी का रचले ? त्यांना नेमके काय साधायचे होते.

१८) खडसावणे हिंदूंनाच कां ? मुस्लिमांना सुद्धा.

# सूर्यासमोर काजवा

(गांधीजींचे बलिदान - सत्य काय आणि असत्य काय?)

**प्रश्न** : ''मी नथुराम गोडसे बोलतोय'' या नाटकावर बंदी घालणे म्हणजे अभिव्यक्ति स्वातंत्र्यावर आघात नव्हे कां ? तुमचे या बाबत काय मत आहे ? गोडसेने जे कृत्य केले ते त्याच्या मतानुसार ऐक धर्मकृत्य होते, त्याच्यापाठी एक धर्म विचार होता. जसा कंस वध तसा गांधी वधसुद्धा एक धर्मसंमत कृत्य आहे अशी विचारधारा या नाटकाद्वारे प्रकट होते. विचाराचा प्रतिवाद विचारानेच केला पाहिजे. प्रतिबंध लादून विचार दडपण्याचे काम केले जात आहे, असे वाटत नाही कां ?

**उत्तर** : प्रश्नाच्या शेवटल्या भागाचा प्रथम विचार करू.

गोडसेच्या नाटकावर प्रतिबंध घालू नये, त्याच्या विचारांच्या अभिव्यक्तिवर निर्बंध घालू नये असे आपल्याला वाटत असल्यास मी आपणास विचारू इच्छितो की गोडसेने विचारांचे उत्तर विचाराने दिले होते काय ? बोलणे बंद करावे म्हणून गांधीजींना गोळी घालून मारले जाऊ शकते, पण गोडसेच्या नाटकावर बंदी घातली तर विचारांच्या प्रक्रीयेवरील आघात वाटतो, याला काय म्हणावे ? गोडसेनें केले ते केले, त्याला आपण आज रोखू शकत नाही, परंतु त्याने साऱ्या विश्वाला वंदनीय असलेल्या महात्म्याला मारून धर्म - विचार, धर्मकृत्य केल्याचा आव आणण्याच्या बुद्धीला काय म्हणावे ? मनोवैज्ञानिक विकृति शिवाय दुसरे काय आहे हे ? गोडसेच्या कृत्यांवर पांघरूण घालणाऱ्यांनी ''विचारांचे उत्तर विचाराने द्यावे'' असे म्हणणे म्हणजे ''सैतान शास्त्र शिकवायला निघाला'' या म्हणीचीं आठवण येते.

आता अभिव्यक्ति स्वातंत्र्य आणि त्यावरिल प्रतिबंधांचा विचार करू.

देशाच्या घटनेच्या कलम १९(१) मध्ये अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा मूलभूत विचार करण्यांत आला आहे, त्या सोबतच त्या स्वातंत्र्याचा दुरूपयोग रोखण्यासाठी .... घटनेच्या कलम १९(२) द्वारे कांही निर्बंधसुद्धा घालण्यात आले आहेत. घटनेद्वारे विरोधीपक्षाच्या नेत्याला कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याचे स्थान आणि सोयी प्रदान करण्यांत आल्या आहेत, परंतु तसे असले तरी त्यांच्या विरोधाला अबाधित अधिकार देण्यांत आलेले नाहीत. त्यांचा विरोध घटणेच्या मर्यादेत बसणाराच असला पाहिजे. अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या व्यक्तीने चूका केल्या आणि समाजाचे नुकसान होईल असे आचरण केले तर काय होईल ? अर्थात् समाज आणि सरकारला हस्तक्षेप करावा लागेल. समाजाने हस्तक्षेप केला तर कायदा हातात घेतल्यासारखे होईल, आणि ते कृत्य केव्हा उचित असू शकेल तर केव्हा अनुचितहि असू शकेल. त्याचे परिणाम अर्थात दोन्ही पक्षांना भोगावे लागतात.

या नाटकांत सत्याचा विपर्यास करण्यांत आलेला आहे. सरकारी मंजूरीसाठी जी संहिता पाठविण्यात आली होती त्यांत मंजूरीनंतर विखारी बदल केले गेल्याचा आरोप आहे. नाटकाच्या लेखकाचे तर म्हणणे आहे की नाटक पाहून बाहेर पडणारे प्रेक्षक गांधीजींचे पुतळे फोडतील आणि गांधींच्या नांवाच्या पाट्यांना काळे फासतील तेव्हांच नाटक यशस्वी झाले असे मी समजेन. यातून उद्रेक निर्माण करण्याचा हेतू स्पष्ट होतो. त्यातहि कायद्याच्या कचाट्यांतून सुटण्यासाठी चलाखी करण्यांत आली आहे. यांत खायचे आणि दाखवायचे दांत वेगळेच आहेत. कोणत्याहि प्रकारे विवेकाचा भंगच नव्हे तर जाणीवपूर्वक बेईमानीहि आहे. अशा कृत्यांचा बचाव करणे, त्यांना न्याय्य ठरविणे या बुद्धीला काय म्हणावे ? थोडक्यांत ही मनोवैज्ञानिक विकृति आहे, समाजांत खोट्या-नाट्या गोष्टी पसरवून त्यांचा पाठपूरावा करण्याचा गुन्हेगारी प्रयत्न आहे. आम्ही सुद्धा अभिव्यक्तीच्या

स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहोत, त्यासाठी तुरूंगातहि गेलो आहेत, परंतु सत्याचे पालन आणि संयम ही स्वातंत्र्याची मुख्य लक्षणे आहेत. स्वातंत्र्य मिळाले म्हणून बेफाम वर्तनाचे अधिकार मिळाले असे नव्हे.

**प्रश्न :** गोडसेने स्वतःच्या बचावनाम्यात जे सांगितले आहे तो एक व्यवस्थित असा विचार वाटतो. बऱ्याच लोकांना तो पटतो. आपल्याला काय वाटते?

**उत्तर :** गांधी - हत्ये नंतर स्वतःच्या बचावासाठी गोडसेला खूप अवधि मिळाला होता. तसा तो शिक्षितसुद्धा होताच, त्यामुळे मिळालेल्या अवधिचा उपयोग त्याने केलेल्या पापी कृत्याला पुण्यकर्माची डूब देण्यासाठी केला. शंभर टक्के असत्य आणि खोटेपणाला त्याने सत्य आणि खरेपणांत बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु लोकशाहित दंडशक्तीचा अधिकार सरकार शिवाय आणखी कुणालाहि दिलेला नसतो. त्यामुळे हत्या म्हणजे हत्याच त्याला कुठलाहि बचाव नाही.

•आता त्याच्या व्यवस्थित बचावाची आणि त्याच्या प्रभावीपणाची गोष्ट घेऊ. सामान्य माणसाच्या भावनांना हात घातल्यास त्याची सहज दिशाभूल होऊ शकते. त्यांच्या बाबतीत खोट्याचे खरे होऊ शकते. कोर्टात वकील मंडळी शब्दांचे खेळ करून मोठमोठ्या न्यायमूर्तींना भूलवत नाहीत कां ? खऱ्याचे खोटे आणि खोट्याचें खरे करत नाहीत कां ? गोडसेने तसे केले असले तरी त्याचा गुन्हा माफ होऊ शकत नाही. त्याने पाप केलेच पण त्याची भलावण करण्यासाठी खोटे निवेदन सुद्धा केले.

**प्रश्न :** गोडसेने म्हटले होते की त्याने दोन कारणांसाठी गांधींची हत्या केली : (१) गांधीजींनी देशाच्या विभाजनाला मंजूरी दिली आणि (२) जे पाकिस्तान आपल्यासमोरे युद्धासाठी ठाकले होते त्यांना भारत सरकारकडून ५५ कोटी रुपये द्यावयास लावले. हे दोन मुद्देच असे होते की कुणालाही खुन्नस चढावा. याबाबत आपण काय म्हणतां ?

**उत्तर :** गांधीजींच्या हत्येचे एकूण आठ वेळा प्रयत्न झाले हा इतिहास आहे, मात्र त्यांतील सहा प्रकारांची लिखीत नोंद आम्ही मिळवू शकलो आहोत. त्यांचा आरंभ खूप पूर्वी १९३४ पासून झाला आहे. त्यांतील तीन प्रसंगात नथूराम गोडसे सामिल होता. आणि दोन प्रयत्नांत पूण्यातील कट्टर रूढीवादी होते. या सहा पैकी चार प्रसंग घडले तेव्हा देशाचे विभाजन आणि ५५ कोटी रूपयांची गोष्ट कुणाच्या स्वप्नांतसुद्धा नव्हती. तर मग त्यावेळी हत्येचा प्रयत्न कां करण्यांत आला ? थोडक्यात सांगायचे तर इंग्रजीतली म्हण Any Excuse serves an evil-does -पाप्याला पाप करण्यासाठी कांहीतरी निमित्त हवे असते आणि ते तर हवे तेव्हा हवे त्याला मिळतच असते. त्याला खून करावयाचाच होता त्यासाठी जे मिळेल ते निमित्त त्याने साधले. शेवटच्या दोन घटनांच्या वेळी देशाचे विभाजन आणि ५५ कोटी रुपयांचे निमित्त मिळाले. बाकीचे प्रयत्न झाले तेव्हा काय होते ? थोडक्यांत तोच प्रवक्ता, तोच पोलिस, तोच न्यायाधिश आणि तोच फाशी चढवणारासुद्धा ! .......... नथूरामला हे सारे अधिकार कुणी बहाल केले ?

हत्येच्या प्रयत्नांच्या घटणांच्या नोंदी खालीलप्रमाणें आहेत.

१) १९३४ साली पूणे म्युनिसिपालिटीने गांधीजींचा सन्मान करण्याचे ठरविले होते. समारंभाच्या स्थानी जात असतांना त्यांच्यावर बॉम्ब फेकण्यात आला. परंतु चुकीमुळे बॉम्ब पुढच्या गाडीवर पडला, गांधीजी मागल्या गाडीत होते. या हल्यात म्युनिसिपालिटीचे मुख्य अधिकारी, दोन पोलिस आणि अन्य मिळून एकूण सात जण गंभीर जखमी झाले. या हल्याच्या वेळी ५५ कोटी रुपयांची गोष्ट तरी होती कां ? पण तरीहि हा जीवघेणा हल्ला करण्यांत आला होता.

२) जूलै १९४४ मध्यें गांधीजी पंचगणीमध्ये होते, तेव्हा एक माणूस हातांत सूरा घेऊन त्यांच्या अंगावर धावून गेला होता. हा माणूस अन्य कुणी नसून नथूराम गोडसेच होता अशी साक्ष पूण्याच्या सूरती लॉजचे मालक मणिशंकर पुरोहित यांनी

दिली होती. महाबळेश्वरचे माजी काँग्रेस संसद सदस्य आणि त्यावेळच्या सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष श्री. भि. दा. भिसारे गुरूजींनीं नथूराम गोडसेच्या हातातला सूरा हिसकावून घेतला होता. गांधीजींनी ताबडतोब नथुरामला भेटावयास येण्याची विनंती केली, पण तोच गेला नाही. जे लोक विचाराचे उत्तर विचाराने द्यावयास हवे असे आज ओरडून सांगत आहेत त्यांनी या घटणेचा सुद्धा विचार करावयास हवा. आणि गांधीजी तर जो कुणी भेटावयास येईल त्याचे स्वागतच करीत असत. पण नथुराम त्यांना भेटला नाही हे सत्य आहे. या वेळीसुद्धा देशाच्या विभाजनाची अथवा ५५ कोटी रुपयांची गोष्टच नव्हती. तर मग हा हत्येचा प्रयास कां झाला ?

३) . तिसरा प्रयत्न सप्टेंबर १९४४ मध्ये झाला. महंमद अली जिना सोबत वाटाघाटी करण्यासाठी गांधीजी मुंबईस जात होते. या प्रसंगाचा गैरफायदा घेण्यासाठी पुण्याहून एक टोळके वर्ध्याला गेले होते. त्यापैकी एक ग. ल. थत्ते नांवाच्या माणसाकडून पोलिसांनी एक सूरा जप्त केला होता. थत्तेने आपल्या बचावांत सांगितले होते की त्याला गांधीजी ज्या मोटारीत बसणार होते त्या मोटारीचे टायर फोडावयाचे होते. परंतु प्यारेलालजींनी लिहून ठेवले आहे की त्यांना त्या दिवशी सकाळीच पोलिस अधिकारी - डी. सी. पी. चा फोन आला होता की निदर्शक कांही अमंगल घटना घडविण्याचा कट शिजवूनच येणार आहेत. गांधीजींचा आग्रह होता की ते एकटेच निदर्शकांना सामोरे जातील. त्यांच्याशी चर्चा करतील, त्यांच्यासोबत चालत गाडीपर्यंत जातील आणि त्यांनी अनुमती देईपर्यंत त्यांच्यासोबतच राहतील. पण गांधीजी निघण्यापूर्वीच पोलिसांनी निदर्शकांना अटक केली. यावेळी तरी देशाचें विभाजन अथवा ५५ कोटींचा संबंध होता कां ?

४)  २९ जून १९४६ रोजी चौथा प्रयत्न करण्यांत आला. खास ट्रेननें गांधीजी मुंबईहून पुण्याला जात होते, तेव्हा नेरळ आणि कर्जतच्या मध्ये रूळांवर मोठे दगड ठेवून ट्रेन उलथवून टाकण्याचे षडयंत्र रचण्यांत आले होते. रात्रीची वेळ असूनहि मोटरमनच्या सावधानतेमुळेच केवळ गंभीर अपघात टळला. इंजीनचे मात्र नुकसान झाल्याची नोंद आहे. यावेळी भारत - पाकिस्तान विभाजनाची चर्चा होती हे खरे पण गांधीजी त्या घटनेस प्राणपणाने विरोध करीत होते हे सुद्धा तितकेच खरे. त्यांनी म्हटले होते की देशाचे विभाजन माझा मुडदा पडल्यावरच शक्य होईल. विभाजन टाळण्यासाठी त्यांनी माऊंटबेटन यांना इथपर्यंत सूचना केली होती की देशाचे पंतप्रधानपद जिना यांना देऊन इंग्रजांनी देश सोडून निघून जावे. थोडक्यात देशाच्या विभाजनासंबंधी केवळ वाटाघाटी चालू होत्या ते स्विकारण्याचा प्रश्नच नव्हता, आणि ५५ कोटी रूपयांचा प्रश्न त्यावेळी कुणाच्या स्वप्नांतसुद्धा नव्हता, तर मग हत्येचा प्रयत्न का बरे करण्यांत आला ? त्यानंतर प्रार्थनेच्या वेळी गांधीनी या घटनेचा उल्लेख करतांना म्हटले होते की मी अशा जीवघेण्या प्रयासांतून सात वेळा बचावला गेलो आहे, मी असे मरण मरणारसुद्धा नाही. मी तर १२५ वर्षे जगणार आहे ..... या गोष्टीचा उल्लेख नथुराम गोडसेने त्याच्या ''अग्रणी'' नांवाच्या अंकात केला होता आणि पुढे म्हटले होते ''पण जगु कोण देतो ?'' म्हणजे त्यांना जिवंत कोण ठेवणार ? गांधीजींच्या हत्येचा त्याचा निर्धार केव्हापासूनच ठरलेला होता.

५) व ६)  २० जानेवारी रोजी मदनलाल पहवा याने बॉंब फेकून गांधीजींच्या हत्येचा निष्फळ प्रयत्न केला आणि ३० जानेवारी रोजी नथुराम गोडसेने गांधीजींचा खून केला. १२ जानेवारी १९४८ नंतरच्या या हत्येच्या प्रयत्नांच्या वेळीच देशाचे विभाजन आणि ५५ कोटी रुपयांचा प्रश्न उपस्थित झाला होता, त्यापूर्वी तर हे प्रश्नच नव्हते.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की हिंदूत्ववाद्यांनी खूनाचे कारस्थान कित्येक वर्षे आधीच रचून ठेवले होते. स्वतःचे पाप झाकण्यासाठी कांहीतरी निमित्त त्यांना हवे होते. जेव्हा जे मिळेल ते खरे. Any excuse serves an evil - doer. पाप करण्यासाठी पाप्याला कांही ना कांही निमित्तच हवे असते.

**प्रश्न :** मुसलमानांना गांधीजींनी लाडावून ठेवले होते त्यामुळेच पाकिस्तानची निर्मिती झाली असे आपणास वाटत नाही काय ?

**उत्तर :** माणसा माणसातले मतभेद तीन टप्प्यांमध्ये होत असतात. प्रथम मनामध्ये आप-परभाव उभा राहतो. ही मतभेदांची बीज स्वरूपी प्रथमावस्था. दुसरा टप्पा दोघांमधल्या ताणतणावांचा आणि शाब्दिक बोलाचालींचा, आणि शेवटी तिसरा टप्पा म्हणजे दोघांमधील भींतीचा म्हणजेच मत भिन्नतेचा. भारत अखंड राखण्यासाठी हिंदुत्ववादी जितके आग्रही होते तितकेच गांधीजी आणि त्यांच्या सोबतचे राष्ट्रवादी नेते सुद्धा होते. देशाचे विघटन होऊ नये, देश अखंड रहावा असे दोहोंनाहि वाटत होते. परंतु दोघांच्या पद्धती मात्र वेगळ्या होत्या. हिंदुत्ववादी लोक मुसलमानांना सांगत होते की तुम्ही म्लेंच्छ आणि यवन आहांत. आपण एकत्र राहू शकू हे खरे, पण हा देश आमचा आहे. हा भारतवर्ष आहे, इथे तुम्ही परके असलांत तरी तुम्ही इतरत्रहि राहता नये आमच्या सोबतच राहवयास हवे. आम्ही या देशाचे पहिले हक्कदार आहोत, आम्ही तुम्हाला ठेवू तसेंच रहायला हवे. गांधीजी आणि त्यांच्या विचाराचे अन्य राष्ट्रवादी मानत होते की मुसलमानांना ''तुम्ही परके आहांत, परके आहात'' असे हिणवण्यामुळे त्यांच्यात परकेपणाची भावना निर्माण होईल आणखी त्यात सातत्याने वाढ होत राहिल. तसे करण्यापेक्षा त्यांना वेगळे ठेवलेले बरे. केवळ वरवर ''तुम्ही आमचेच आहांत'' असे म्हणणेसुद्धा चुकीचे ठरेल. हृदयापासून आपुलकी दाखविली तरच ती निर्माण होईल आणि परकेपणाची भावना दूर होईल. आपलेपणाच्या भावनेने आणि एकत्र मिळून

मिसळून राहिल्याने आणि काम केल्याने उपजतच आपलेपणा निर्माण होईल. जखमेवर मीठ चोळून ती अधिक तीव्र करायची की मलमपट्टी करून बरी करायची याचा विचार आपणांस करावयास हवा. हिंदूत्ववादी लोक जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत होते तर गांधीजी आणि त्यांचे सोबती मलमपट्टी करण्याचे काम करत होते.

हिंदू समाजातल्या जात-पात उच्च-नीच या भेदभावनेसुद्धा यात महत्वाचा वाटा उचलला आहे. या देशांत मुसलमानांची संख्या एवढी वाढली कशी ? हिंदू समाजातल्या जाती पातींच्या व उच्च-नीचतेच्या राजकारणाला कंटाळून पूर्वीच्या काळी अनेक जणांनी इस्लाम धर्म स्विकारला होता. त्यांना जात पात खटकत होतीच पण अनेक देवतांच्या पूजा अर्चासुद्धा मान्य नव्हत्या. कित्येकांना हिंदू समाज अस्पृश्य आणि कनिष्ठ वर्गातले समजत. या लोकांनी धर्मांतर केले. पण त्यांच्या मनांत कटूता मात्र राहिली, बरेच जण असेहि होते की त्यांना जबरदस्तीमुळे इस्लामचा स्विकार करावा लागला होता. असे अनेक लोक पुन्हा हिंदू धर्मात परतू पाहत होते पण हिंदू धर्माचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद झाले होते. आज आपल्या देशांत, पाकिस्तानांत आणि बांगला देशात जे मुसलमान आहेत ते एकेकाळी हिंदूच होते. त्यांतले अगदी थोडे मुळ अरबस्तानांतले असतील, अगदी निवडून काढावे इतकेच. म्हणजे मुळ रक्त हिंदूंचेच आहे. परंतु विघनटवादी हिंदूंनी त्यांच्या दुफळीच्या व्यवहारानें मुसलमानांमध्ये परकेपणाची भावना निर्माण केली. हिंदू समाज उच्च-निचतेच्या आणि स्पृश्य अस्पृश्यतेच्या भावनेमुळे त्यांना आपल्या सोबत ठेवू शकला नाही, की सोबत नेऊ शकला नाही. इतिहासात पूरावे सापडतील की काश्मिरमधील मुस्लीम एकेकाळी हिंदू धर्मांत परत येऊ इच्छित होता, पण काशीच्या पंडितांनी लंबाचौडा शास्त्राधाराचा बडगा दाखवून त्यास विरोध केला. आज काश्मिरांत मुस्लीमांची संख्या अधिक असल्याने पाकिस्तान त्यांच्या धार्मिक

भावना भडकवण्याचे काम करत आहे आणि आपल्यासाठी ती एक डोकेदुखी होऊन बसली आहे.

ही परकेपणाची दरी पिढीगणीक रूंदावत गेली. ज्यांना या गोष्टीचा लाभ उठवायचा होता त्यांनी, मुख्यतः त्यावेळच्या इंग्रज राज्यकर्त्यांनी आपल्या स्वार्थासाठी ही दरी अधिक रूंद करण्याचें आणि एकमेकांविषयी द्वेश भावना अधिकाधिक भडकवण्याचे, एकमेकांना झगडत ठेवण्याचे आणि कट्टरता वाढविण्याचे काम केले. शेवटी जिना आणि त्यांच्या साथीदारांनी त्या भावनेला खतपाणी घालण्याचे काम केले. त्यांच्या मदतीने इंग्रजांनी पाकिस्तानची निर्मिती केली.

**प्रश्न :** गांधीजी मुसलमानधार्जिणें असल्याचा आणि मुसलमानांना जवळ करण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचा आक्षेप आहे. या बाबत तुम्हाला काय म्हणावयाचे आहे?

**उत्तर :** गांधीजी मुस्लीमांना संतुष्ठ करण्यासाठी प्रयत्नशिल होते असा आक्षेप त्यांच्यावर करण्यांत येतो, असाहि समज आहे की त्यांच्या संतुष्ठीकरण्याच्या नितीमुळेच देशाची फाळणी झाली, परंतु मुसलमानांना मुख्य प्रवाहांत ओढण्याचे प्रयत्न गांधीजी भारतात येणापूर्वीपासून चालू होते. १९५७ च्या उठावाच्या ५० व्या वर्धापनदिनी १९०७ साली इंग्लडमधील एका सभेत वीर सावरकर यांनी मुसलमानांचा उल्लेख इंद्रधनुष्याचा एक रंग असा केला होता. १९०९ साली धर्मनिहाय मतदार संघांची निर्मिती झाली. १९१६ साली लखनौ करार झाला त्यांत मुस्लीमांच्या संख्येच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रतिनिधित्व त्यांना देण्याच्या मागणीचा स्विकार करण्यात आला. गांधीजी तेव्हा भारतात परतले होते हे खरे पण तेव्हा ते अगदीच नवखे होते. लखनौ कराराच्या वाटाघाटींत त्यांचा कांहीच हिस्सा नव्हता. तर मग त्यामागील सुत्रधार कोण होते ? त्यांत दोन व्यक्ति मुख्य होत्या - लोकमान्य

टिळक आणि महम्मद अली जिना. स्वतःच्या निर्णयाचे समर्थन करताना लोकमान्यांनी म्हटले होते,

''कित्येक मान्यवरांना वाटते की आम्ही मुसलमान बंधुना अधिक महत्व देतो. मी तर सांगू इच्छितो की स्वःशासनाचा अधिकार केवळ मुस्लिमांना बहाल केला गेला तरी माझी हरकत नाही. रजपुताना तसा अधिकार मिळाला तरी माझी हरकत नाही. आणि हिंदुमधल्या अगदी मागासवर्गियांना लाभला तरी माझा विरोध नाही. भारतातल्या कोणत्याही समुदायाला हा अधिकार दिला गेला तरी माझी हरकत नाही. माझ्या या निवेदनात समग्र राष्ट्रीय भावनेचे प्रतिनिधित्व आहे. तुम्ही कुणा तिसऱ्याच पक्षाशी लढता तेव्हा आपापसातील ऐक्य भावना, जातीय एकता, धार्मिक ऐक्य आणि निरनिराळ्या राजकीय विचारधारांचे ऐक्य या गोष्टींची नितांत जरूरी असते.'' लोकमान्यांच्या या धैर्यशाली निखालस निवेदनामुळे जे लोक विरोध करत होते ते सर्व चूप झाले. (संदर्भ : भारतका स्वतंत्रता संग्राम पान १०)

श्यामाप्रसाद मुखर्जीनीसुद्धा स्वतंत्र भारतातल्या पहिल्या मंत्री मंडळातून बाहेर पडल्यावर हिंदू महासभेमध्ये प्रवेश केला नाही. स्वतंत्र भारतात मुसलमान अथवा अन्य धर्माच्या लोकांना एखाद्या राजकीय पक्षात प्रवेश नाकारणे योग्य नाही अशा मताचे ते होते. सुभाष बाबूंची तर तक्रार होती की काँग्रेसमध्ये मुसलमानांना अधिक प्रतिनिधित्व मिळावयास हवे. त्यांना त्यांच्या सहभागापेक्षा कमी हिस्सेदारी दिली जाते अशा मताचे ते होते. यावरून मुसलमानांना जवळ आणण्यासाठी केवळ गांधीजींनीच नव्हे तर हिंदुवादी आणि अन्य नेत्यांनीसुद्धा सतत प्रयत्न केले होते हे स्पष्ट होते.

**प्रश्न :** पाकिस्तानची मागणी काँग्रेस आणि गांधीजींनी स्विकारली. त्यांनी मान्यता दिली नसती तर पाकिस्तान थोडाच बनणार होता ?

उत्तर : पाकिस्तानची मागणी खूप उशीरा करण्यांत आली पण त्याचा सिद्धान्त त्याच्या खूप आधीपासून मांडण्यात आला होता. महाकवी इक्बाल, ज्यांनी "सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्ता हमारा" लिहिले. गीत खूपच सुंदर असल्याने आझादीच्या लढाईत आम्ही खूप उत्साहाने आणि आनंदाने गात असूं. तेच कवी इक्बाल १९३० साली अलाहाबाद येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनांत भाषण करतांना म्हणाले "माझी इच्छा आहे की, पंजाब नॉर्थ वेस्ट फ्रंटियर, सिंध आणि बलुचिस्तान या सर्वांचे एकत्रिकरण करून एका राज्याची निर्मिती केली जावी. भारतालगतचे पश्चिम-उत्तर मुस्लीम राज्य, मग ते ब्रिटिश साम्राज्याचा हिस्सा असो वा स्वतंत्र असो. निर्माण झाले, तरच मुसलमानांचे भाग्य उजळेल असे मला वाटते.

इक्बालच्या या वक्तव्यावर १९३७ साली मंजूरीची मोहर लागली. हे वाचाः

"आज हिंदुस्तान अेकजीव, अेकात्म राष्ट्र आहे असे मानण्याची चूक आपण करता कामा नये. उलट या देशांत मुख्यतः हिंदु आणि मुस्लीम अशी दोन राष्ट्रे आहेत, हे मान्य करावयासच हवे."

हे वक्तव्य महम्मद अली जिनांचे वाटत नाही कां ? दोन राष्ट्रांचा पक्का आणि चटकन स्विकारला जाऊ शकतांना हाच ना तो सिद्धान्त ? याच्यावर कुणी मंजूरीची मोहर मारली आणि कुठे ? जाणू इच्छितां ? ऐका तर, १९३७ साली, आपल्याच या अहमदाबादमध्ये वीर सावरकरांच्या अध्यक्षतेखालील हिंदु महासभेच्या अधिवेशनां्त ही मंजूरीची मोहर मारली गेली. १९४३ मध्ये वीर सावरकरांच्या एका वाक्याची नोंद मिळते, "माझा मि. जिनांच्या दोन राष्ट्रांच्या सिध्दान्ताला विरोध नाही, आम्ही हिंदु स्वतः एक राष्ट्र आहोतच ते तर एक ऐतिहासिक तथ्य आहे. हिंदु आणि मुसलमान दोन वेगवेगळी राष्ट्रे आहेत. (संदर्भ : इंडियन ॲन्युअल रजिस्टर १९४३, भाग - २ , पान - १०) मुस्लीम लीगच्या

अधिवेशनांत इक्बाल म्हणतात की त्यांचे वेगळे राज्य हवे, तसे झाले तरच बेडा पार होईल, आणि हिंदु महासभेच्या मंचावरून वीर सावरकर सांगतात की हिंदु आणि मुस्लीम या दोन प्रजा दोनच आहेत, वेगवेगळ्या आहेत, ती दोन राष्ट्रेच आहेत. मग आता काय बाकी राहिले ? पाकिस्तानच्या सिद्धान्ताला कुणी पुष्ठी दिली ? त्याचा उच्चार प्रथम कुणी केला ? स्विकार प्रथम कुणी केला ? ते सूर्यप्रकाशाएवढे सत्य आहे. सावरकर हे एकच वाक्य बोलले असेहि नव्हे. संपूर्ण हिंदुत्ववादी चळवळच हिंदु - मुस्लीम विघटणाच्या पायावर उभी होती - १९२० च्या दरम्यान. देशाच्या फाळणीसाठी मुस्लीम लीग जितकी जबाबदार आहे तितकेच हिंदुत्ववादीसुद्धा आहेत, या दोघांनी मिळूनच पाकीस्तानची निर्मिती केली आहे. एकीकडे फुटीरतावादाची ही चळवळ हळूहळू पण भक्कमपणे पुढे जात होती तर दुसरीकडे गांधीजी आणि काँग्रेस हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठी चळवळ करत होते. गांधीजी दक्षिण आफ्रिकेत असल्यापासून त्यांच्या प्रार्थना सभांमध्ये हिंदु, बौद्ध, मुस्लीम, पारसी, इसाई वगैरे धर्मांच्या प्रार्थना आणि भजने म्हटली जायची. एकाच ईश्वराची आपण लेकरे असल्याची गोष्ट ठसविली जायची, गळी उतरविली जायची. साबरमती आश्रमांत कुरेशी साहेबांसारखे मुस्लीम सुद्धा राहत होते. धार्मिक ऐक्य हे संपूर्ण स्वराज्य चळवळीचे महत्वाचे अंग होते. त्यासाठी समान प्रयत्न झाले होते याला इतिहास साक्ष आहे. काँग्रेसमध्ये अखिल भारतीय स्तरावरचें कितीतरी मुसलमान पुढारी होते. - डॉ. अन्सारी, हकीम अजमलखान, बदरूद्दीन तैयबजी आणि खुद्द जिना सुद्धा एकेकाळी काँग्रेसमध्ये होते. या साऱ्यांचे सरताज खान अब्दूल गफ़ारखान होते तर मौलाना अबुल कलाम आजाद काँग्रेसच्या अध्यक्षपदी होते. हे केव्हा ! तर जेंव्हा हिंदुवादी, आर. एस. एस. हिंदुमहासभा वगैरेमध्यें हिंदु-मुस्लिम ऐक्याची गोष्टच सोडा पण, मुसलमानांविषयी वैरभावाची भावना, आणि त्यांच्याशी लढण्याचे एकमेव ध्येय होते. आता तुम्हीच सांगा की

विभाजनासाठी पृष्ठभूमि कुणी तयार केली ?

**प्रश्न :** तर मग काँग्रेस आणि गांधीजींनी पाकिस्तानला पाठिंबा दिला असे म्हटले जाते त्याचे काय ?

**उत्तर :** हिटलरचा साथीदार गोबेल्स याचा एक लाडका सिद्धान्त होता की हवे तेवढे खोटे असूं दे ते पुन्हा पुन्हा लोकांच्या माथी मारले म्हणजे कालांतरानें खरे वाटू लागते. हिंदुत्ववादी राजकारण्यांनी राजकरणांत आपल्या सोयीप्रमाणे कोलांटउड्या मारून निवडणूका जिंकण्यास कमी केले नाही, निवडणूका जिंकण्यासाठी सातत्यपूर्वक आणि व्यवस्थितपणानें त्यांनी देशव्यापी स्तरावर असत्याचा प्रचार केला, लोक भूलले आणि लाभ मात्र त्या राजकरण्यांचा झाला हे आता जगजाहिर झाले आहे. अन्यथा देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत ज्यांचा एक टक्कासुद्धा हिस्सा नव्हता असे लोक आज राज्यात आणि देशांत उच्च स्थानावर आहेत याचे कारण काय ? अर्थात लोकांचा भोळा स्वभाव.

जो पर्यंत काँग्रेस गांधीजींच्या मार्गाने चालली होती तोवरचा इतिहास पाहण्यासारखा आहे. एक प्रसंग पहा. लॉर्ड वावेल यांनी जिनांना मुसलमानांचे प्रतिनिधी आणि गांधीजींना हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून चर्चा करण्यासाठी बोलावले. गांधीजींनी त्यांची चलाखी जाणली. त्यांनी त्याला प्रत्युतर पाठविले की जिनांना मुस्लीम लीगचे (तमाम मुसलमानांचे नव्हे) आणि मौलाना आबूल कलाम आझाद यांना काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून बोलावणे पाठवा. स्थिती अशी झाली की वावेलच्या डावीकडेहि मुसलमान अन् उजवीकडेसुद्धा मुसलमान. दोन धर्म, दोन राष्ट्रे या गोष्टी काँग्रेसला मान्य नव्हत्या आणि गांधीजींची तर गोष्टच सोडा. ते तर म्हणत की पाकिस्तानची निर्मिती माझा मुडदा पाडूनच केली जाऊ शकेल.

पण जिना भारतांतल्या मुसलमानांना गुमराह करण्यांत यशस्वी झाले होते. अर्थात राष्ट्रवादी मुस्लीमांची संख्यासुद्धा लक्षणीय होती. सुहरावर्दी, हयातखान,

बंगालचे फझलुल हक, आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे नॉर्थ वेस्ट फ्रंटीयर प्रोवीन्समध्यें अब्दुल गफारखांन वगैरे पाकिस्तानच्या निर्मितीच्या विरोधांत होते. परंतु जिना आणि त्यांच्या साथीदारांच्या चिथावणीमुळे वर्णनहि न करता यावी अशी भीषण परिस्थिति आणि खून - हत्याकांड सुरू झाले. इंग्रजांची निति तर विभाजन करण्याचीच होती. त्यांना तर बाटलीतून भूतच बाहेर काढावयाचे होते. त्यामुळे जनतेच्या आम लोकांच्या हृदयांत चिंतेने काहूर माजविले.

दुसरीकडे देशांत तडजोडीचे वातावरण निर्माण होऊन शांति निर्माण होत नाही तो पर्यंत इंग्रजांना सत्तेवरून न हटण्यासाठी निमित्त मिळत होते. स्वातंत्र्य जणू दूर पळतेय असे वाटत होते. वर माऊंटबॅटनने तर साफ साफ सांगितले होते की नेमून दिलेल्या वेळेत निवाडा करा अन्यथा इंग्रज आहे ती स्थिती ठेवून निघून जातील. याचा अर्थ असा होता की लहान मोठे शेकडो राजे रजवाडे स्वतंत्र होतील, इंग्रजांच्या शासनाखालील प्रांतसुद्धा स्वतंत्र होतील. कापाकापी केवळ हिंदु-मुस्लीमांमध्येच नव्हे तर राजे - रजवाडेसुद्धा एकमेकांविरूद्ध आणि ब्रिटिश अंमलाखालील प्रांतावर ताबा मिळविण्यासाठी शस्त्रे उपसतील. अशी एक कल्पनातीत भयंकर अराजकाची स्थिती राष्ट्राच्या नेत्यांसमोर येऊन ठाकली होती. काय करावे ? अशा परिस्थितीत कॉंग्रेसने ''अर्धम् त्यजति पंडिताःना'' न्यायाचा स्विकार केला.

पण गांधीजींचे काय ? ते तर मानतच नव्हते. ते शेवटपर्यंत सांगत होते की जिनांना देशाच्या प्रधानमंत्रीपदी बसवून इंग्रजांनी चालते व्हावे. परंतु माऊन्टबेटन आणि त्यांच्या बहकाव्यांत आलेल्या कॉंग्रेसला गांधीजींची गोष्ट अव्यवहार्य वाटत होती.

शेवटी गांधीजींना बाजूला सारूनच निर्णय घेतला गेला - पाकिस्तानच्या निर्मितीच्या ठरावावर गांधीजींना अंधारांत ठेवून चर्चा करण्यांत आली. ठराव पास

झाल्यानंतरच त्याची माहिती गांधीजींना देण्यात आली. त्यासाठी प्रथम पंडित नेहरू आणि सरदार पटेल वगैरेंनी माऊन्टबेटन यांच्याशी झालेल्या चर्चेच्यावेळी आपली संमति दिल्यानंतरच गांधीजींना माहिती दिली गेली. पण तरीहि गांधींनी तो आघात खिलाडू वृत्तीने सहन केला. ते समजून चुकले होते की सद्य परिस्थितीत काँग्रेस दुबळी झाली तर देशाचे अकल्पित नुकसान होईल. देशाला तारू शकणारी आणखी दुसरी शक्ति तेव्हा देशांत अस्तित्वातच नव्हती.

गांधीजींना मनोमन वाटले की त्यांना फसविण्यात आले आहे. त्यांच्यावर मोठाच आघात झाला त्या घटनेचा. पण मग त्यांनी स्वतःचीच समजूत करून घेतली. त्यांची एकट्याचीच इच्छा किती महत्वाची ? ते हतोत्साहीत होऊन "हे भगवान मला आता या जगांतून उठव" असे भावनेच्या भरांत बोलू लागले आणि शेवटी आजारी असतांना सुद्धा शक्य असेल तिथे जाऊन शांतीचे कार्य करण्यास पुढे सरसावले. सेवाग्रामला जाण्याऱ्या एका भगिनीने आश्रमवासीयांसाठी त्यांच्याकडे संदेश मागितला तर म्हणाले "..... नेहमी मी सांगेन तोच मार्ग असे तुमचे मानणें असेल तर ते चूकीचे आहे. वस्तुस्थिति अशी आहे की इश्वराकडे मी प्रार्थना करतोय की हे जीवन माझ्यासाठी असह्य झाले आहे आता मला इथून उचलून नें." दुसऱ्या एका मित्राला त्यांनी लिहिले की मी आतां पुन्हा केव्हा सेवाग्रामला परतून येईन असे वाटत नाही.

**प्रश्न :** तर मग देशाची फाळणी रोखण्यासाठी आमरण उपोषण का सूरू केले नाही त्यांनी ? आज हिंदुत्ववाद्यांचा प्रश्न आहे की त्यांनी आमरण उपोषण कां केले नाही ? आणि ५५ कोटी रुपये देण्याचे कां मान्य केले ?

**उत्तर :** गांधीजींनी स्वतःच याचे उत्तर दिले आहे. त्यांना आलेल्या एका पत्राचे उत्तर देतांना त्यांनी म्हटलेय - मी म्हणजे कोण ? एक व्यक्ति म्हणून माझे कांहीच

मूल्य नाही. ज्या लोकांचा प्रतिनिधि म्हणून मी बोलत होतो, ते लोक तर आज मला सोडून गेले आहेत. त्यांना माझे सांगणे रूचत नाही, त्यांना फाळणी मंजूर आहे, त्यांची मजबूरी आहे, माझी मात्र माझ्या विचारांवर पूर्ण श्रद्धा आहे, ज्यांच्यासाठी मी लढत आहे, तेच फाळणीसाठी तयार झाले आहेत, त्यांचाच जर माझ्यावर विश्वास राहिला नसेल तर मी लढू तरी कुणासाठी ? संपूर्ण देशांत हिंसेचा आगडोंब आणि रक्तपात होत आहे, मी बंधूत्वभावाची, शांतिची, प्रेमाची गोष्ट करू लागलो तर ते कुणाला मानवत नाही हिंदु मुसलमानांना या देशांतून हांकलून लावू पाहत आहेत. संपूर्ण परिस्थिति बदलली आहे. देशाच्या अखंडत्वासाठी लढू म्हटले तरी कुणासाठी लढू ? फाळणीसाठी इन्कार करू म्हटले तरी ती लहान सहान गोष्ट नाही.

भौतिक तुकडे तर झाले, पण हृदय तरी जोडण्याचें काम शक्य होते. खान अब्दुल गफार खान यांना भेटण्यासाठी आणि जिनांनी अल्पसंख्यांकांसाठी जे वायदे केले होते त्यांची अंमलबजावणी कशी केली आहे हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी पाकिस्तानांत जायची इच्छा गांधीजींनी अनेकवार केली होती. पाकिस्तान हा माझाच देश आहे तिथे जायला मला व्हीसा घेण्याची जरूरी नाही असे सुद्धा ते म्हणत असत. ते जगले असते तर दुनियेने पाहिले असते की दक्षिण आफ्रिकेत असतांना प्रतिबंधांचा भंग करून नाताळची सरहद्द त्यांनी ओलांडली होती, तशीच पाकिस्तानची सरहद्द सुद्धा सत्याग्रह करून आलोंडली असती, फाळणीचा इन्कार करण्याची त्यांची ती सत्याग्रही रीत होती. स्वतः शहीद होण्याची त्यांची भावना जरूर होती, पण ज्यांनी त्यांना जन्मभर साथ दिली त्यांची अडचण सुद्धा ते जाणत होते. जे झाले त्याला त्यांनी प्रकट विरोध केला नाही, मात्र अंतःकरणापासून त्यांना ते मान्य नव्हते हेच वरिल घटनांवरून सिद्ध होते.

आणखी एक घटना घडली होती. कित्येक लोक फाळणीच्या विरोधांत गांधीजींची साथ करण्यास तयार झाले होते. कोण होते हे लोक ? त्या दिवसांपर्यंत गांधीजींना शिव्या-शाप देणारेच ते लोक होते. त्या लोकांना देशाची अखंडता तर राखायची होती पण फाळणीहि करावयाचीच होती - हिंदु आणि मुसलमान दोन धर्म, दोन राष्ट्रे ही भाषा बोलणारे ते लोक होते. मुसलमानांनी येथे दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून रहावे अशा गोष्टी ते करत होते. हिंदु धर्म अद्वैताचा सिद्धांत सांगतो, सर्व विश्व एक कुटुंब आहे - वसुधैव कुटुंबकम् असे म्हणतो, पण त्याच्यासाठी लढण्यास निघालेले देशाच्या ऐक्याची गोष्ट करत असले तरी अंतःकरणापासून त्यांना फाळणीच हवी होती. जून्या वैराचा हिशेब चुकता करायचा होता. आपण सर्व जाणतो की कुटुंबात सुद्धा एकदा मतभेद झाले आणि ते चालूच राहिले तर शेवटी कटूताच निर्माण होते. हिंदुत्ववादी ही गोष्ट तेव्हाही समजले नव्हते आणि आताहि समजू शकलेले नाहीत. त्यांना लढण्यासाठी कारण हवे असते. हिंदु आणि मुसलमानांत दुफळी नसेल तर त्या लोकांचा धंदाच बसेल. अशा लोकांना आपल्या सोबत घेण्याचे गांधीजींनी कसे मान्य केले असते ?

'कुणालाहि आकलन न झालेल्या आणखी एका गोष्टीचे स्पष्टीकरण आम्हाला हवे. गांधीजींनीं उपवास करावयास हवा होता असे हिंदुत्ववादीच म्हणत होते. आणि हेच लोक गांधीजींना देशद्रोही, हिंदुद्रोही आणि वध करण्यालायक समजत होते, तर मग त्यांची लढाई गांधीजींनी करावयास हवी होती असे ते कसे मानतात ? त्यांचे हिंदुत्ववादी पुढारी सावरकर, भोपटकर, गोलवलकर, मुखर्जी, मुंजे, खरे वगैरे नव्हते काय ? त्यांच्या नेत्यांनी स्वातंत्र्य लढ्यांत भाग घेतला नव्हता, बलिदान दिले नव्हते, दुःख आणि कष्ट उपसले नव्हते हे ते पूरते जाणून होते. ज्यांचे नांव देखील ठाऊक नव्हते अशांनी उपवास केला असता तर त्याचा कांहीच परिणाम झाला नसता. ती शक्ति तर केवळ गांधीजींजवळच होती. गांधीजी

भारतांत आले तेव्हा सावरकर गांधीजींहून दहा वर्षांनी लहान आणि तरूण होते. आणखीहि कांही नेते होते ते गांधीजीसारखे भक्कम नेतृत्व कां देऊ शकले नाहीत ? त्याचे कारण हे होते की त्या नेत्यांना जनतेच्या ह्रदयात स्थान नव्हते. खऱ्या खोट्या इतिहासाचा दाखला देऊन लोकांच्या ह्रदयांत एकमेकांविषयी वैरभाव आणि वीषाची पेरणी करून हिंसा भडकावण्याच्या प्रयत्नांशिवाय त्यांच्याकडे अन्य कार्यक्रमच नव्हता.

**प्रश्न :** पंचावन्न कोटी रूपयांच्या उल्लेख अजून आला नाही. त्याबाबत आपण काय सांगाल ? गांधीजींनी त्याबाबत पाकिस्तानची म्हणजेच मुस्लीम धार्जिणी बाजू घेतली नव्हती काय ?

**उत्तर :** पंचावन्न कोटी रूपयांच्या मुद्यावरून गांधीजींना मुस्लीम धार्जिणे मानणे बरोबर होणार नाही. गांधीजी खूप पुढचा विचार करत असत. पैसे चुकते करणे ही भारताची नैतिक जबाबदारी होती आणि त्यांत भारतानें माघार घेता कामा नये असा त्यांचा पक्का निर्धार होता. त्यांचे उपोषण आणखीहि कांही कारणांसाठी होते.

ज्या महापुरुषाने आपले सारे आयुष्य ''शठं प्रति शाठ्यं'' - जशास तसे ऐवजी ''शठं प्रति सत्यम्'' गुंडगिरीचा सामना सुद्धा सत्याच्या सहाय्यानेच लढण्यांत घालविले. तो सत्याचा आग्रही महापुरुष कसोटीच्या क्षणी माघार कशी बरे घेईल ? धर्मासाठी स्वतःचे प्राण पणास लावणारा महापुरूष पंचावन्न कोटींच्या मोहानें माघार घेईल असे कसे बरे होईल ?

चौथे आणि महत्वाचे कारण म्हणजे भारताच्या उदार धोरणाचा चांगला परिणाम अखिल जगतावर आणि मुख्यतः पाकिस्तान आणि तिथल्या जनतेवर निश्चितच होईल असे त्यांना वाटत होते. त्यांना तर असे वाटत होते व त्यांची इच्छासुद्धा होती की भविष्यांत भारत आणि पाकिस्तान पुन्हा एक होतील, जरी एक झाले नाहीत तरी चांगल्या शेजारधर्मानें, बंधूत्व भावनेने नांदतील. या

शक्यतेसाठी सुद्धा उदार धोरणाची जरूरी होती.

त्यांनी केलेल्या उपोषणामुळे परिस्थितीत निश्चितपणे फरक पडला होता.

बरेलीचे मौलवी गांधीजींना संबोधून एका निवेदनांत म्हणतात,

''पाकिस्तानांत चाललेल्या अत्याचारांसाठी निर्दोष स्त्री-पुरुष आणि बालकांच्या हत्येसाठी बलात्कारांसाठी, धर्मांतरासाठी, स्त्रीयांच्या अपहरणासाठी आपल्याप्रमाणेच माझे हृदयसुद्धा द्रवते. हा अल्लाह समोर गुन्हा आहे. आणि त्याच्यासाठी कोणत्याही प्रकारची माफी नाही. पाकिस्तान सरकारने हे जाणावसाय हवे ...... असे बेशरम प्रकार, इस्लामविरोधी दुष्कृत्ये बंद करून बिनशर्त पश्चाताप जाहिर करावा असा पाकिस्तानमधल्या माझ्या अनुयायांना मी आदेश देतो. ...... हिंदुस्तानातल्या माझ्या अनुयायांना तसेच मुसलमानांना माझा आदेश आहे की त्यांनी आपल्या सरकारशी निष्ठा ठेवावी आणि पाकिस्तानांतल्या आपल्या सहधर्मियांचा साफ साफ निषेध करावा. .... केंद्र सरकारशी त्यांची निष्ठाच त्यांना सहिसलामत ठेवून त्यांचे रक्षण करू शकेल. मुसलमानांनी हे पक्के लक्षांत ठेवावयास हवे की रक्षण आणि मदतीसाठी पाकिस्तानवर ते अवलंबून राहिले तर त्यांचा सर्वनाश अटळ आहे. .....''

त्याचे पडघम पाकिस्तानांतसुद्धा पडले. पाकिस्तानचे पुनर्वसन मंत्री राज गजनफर अली खान यांनी वृत्तपत्रांत निवेदन दिले की ''गेल्या कांही महिन्यांत हिंदुस्तान आणि पाकिस्तानांत अधोगतीने कळस गांठला आहे. त्याच्यावर परिणामकारक इलाज करावयास हवा होता आणि महात्मा गांधींनी या परिस्थितिचा सामना करण्यासाठी स्वतः विरोध प्रकट केला आहे.''

पाकिस्तानातल्या पश्चिम पंजाब क्षेत्रांतसुद्धा त्याचा परिणाम झाला. फिरोझखान नून त्याबाबत म्हणतात ''धर्म प्रवर्तक वगळता महात्मा गांधीपेक्षा महान पुरुष दुनियेतल्या कोणत्याही देशाने निर्माण केलेला नाही.''

अर्थमंत्री मिया मुमताजखान म्हणाले होते : "हा उपवास सिद्ध करतो की, हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठी स्वतःचे जीवन अर्पण करू शकणारा एकतरी पुरुष हिंदुस्तानांत अस्तित्वात आहे ..... या सभागृहातून महात्मा गांधींना मी ग्वाही देतोकी अल्पसंख्यांकांच्या रक्षणासाठी त्यांच्या इतकेच आम्हीसुद्धा कटीबद्ध राहू."

प्रधानमंत्री मामदोतखान यांनी महात्मा गांधींच्या कृत्याबद्दल चिंता आणि आदराची भावना व्यक्त करून म्हटले होते की : "त्यांचे अमूल्य प्राण वाचविण्यासाठी या देशांतला प्रत्येकजण त्याच्यापरिने प्रयत्न करिल."

भारतातले पाकिस्तानचे हायकमिशनर जहीद हुसेन आपल्या संदेशात म्हणतात "आज हिंद मध्ये - यात मी पाकिस्तानचा सुद्धा समावेश करतो - सर्व जनता वैर आणि कलुषीत कलहामधून उत्पन्न झालेल्या यातना आणि विपदा भोगत आहेत. त्यांचा अंत नजरेच्या टप्प्यांत दिसत नाही मात्र देशावर आलेल्या या दूर्धर प्रसंगांतून तारू शकणारी एकमेव व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी आहे. साऱ्या जनतेच्या नजरा त्यांच्यावरच खिळालेल्या आहेत ..... हिंद-मानवी मूल्यांचा रखवालदार आहे. आम्ही सर्व प्रार्थना करतो आणि आशा करतो की, महात्मा गांधींच्या आदर्शांपासून प्रेरणा घेऊन या कठीण प्रसंगातून आम्ही निश्चितपणे बाहेर पडूं."

दुसऱ्या बाजूने पण त्यांच्या प्रयत्नांना यश येत होते. "पूर्णाहुति" मधून घेतलेला हा उतारा पहा :

"याचवेळेदरम्यान शांतीकार्यासाठी पश्चिम पंजाबमध्ये गेलेल्या मुसलमानांच्या प्रतिनिधी मंडळाने तिथून येतांच गांधीजींना अहवाल सुपूर्त केला. त्यांचा अभिप्राय असा होता की, हिंदु आता लाहोरला परतू शकतात आणि तिथे सुखरूपपणे राहू शकतात. परंतु शीखांनी मात्र थोडी कळ काढावयास हवी. त्यांनी आणखी सांगितले की "शांतीकार्यासाठी गेलेल्या संपूर्ण देशाचे प्रतिनिधी म्हणून आम्ही

इथे नमूद करू इच्छितो आणि आमच्या बिगर मुस्लिम बांधवांना खात्री देऊ इच्छितो की, ज्यांना ज्यांना आपल्या घरी परतावयाचे आहे त्यांच्या सोबत आम्ही स्वतः जाऊन तिथे स्थिरस्तावर व्हायला त्यांना मदत करू. आमच्या जीवांत जीव असे पर्यंत त्यांचे रक्षण करू आणि जोपर्यंत त्यांना सुरक्षित वाटत नाही तोपर्यंत त्यांच्यासोबत राहू.''

परंतु ज्यांना या प्रसंगी रक्ताचीच होळी खेळावयाची होती ते याबाजूचे हिंदुधर्मीय आणि पलिकडचे मुस्लीम धर्मीय. आम जनतेला भडकवण्याचे काम करत होते. धार्मिक चिथावणीखोरांनी तर जनतेमध्ये खऱ्या खोट्या अफवांचे पेवच उठवले होते. त्यांच्या प्रभावाने जनतेमध्ये जणू राक्षसी उन्माद संचारला होता.

दोन देशांना पुन्हा एकत्र करण्यासाठी, किमान दोघांमध्ये एकमत आणि एकमन करण्यासाठी आपल्या जीवनातल्या अखेरच्या दिवसांत गांधीजी अक्षरशः जीवांचे रान करत होते. प्रेम, अहिंसा, सत्य आणि सद्‌गुणांचे आचरण हे सर्वथा निरपेक्ष असते, त्यांत कोणत्याहि तऱ्हेची सौदेबाजी असू शकत नाही ही गोष्ट दुनियेला पटण्यास अजून खूप अवधि होता. परंतु स्वतःच्या अंतापर्यंत - ३० जानेवारीपर्यंत ही गोष्ट गांधीजी समजावत राहिले आणि त्याच मार्गाने परलोकी गेले.

**प्रश्न :** आपण म्हटलय की गांधीजींच्या हत्येपाठी पूण्याचेच कित्येक नागरिक होते, ते कसे ? जरा समजावून सांगाल तर बरे. दुसरे हे पण सांगा की टिळक आणि सावरकरांचा एवढा प्रभाव का पडला नाही ? ते गांधीजींसारखे आंदोलन उभारू शकले नाहीत असे आपण म्हटले आहे ते जरा सविस्तरपणे समजवा.

**उत्तर :** लोकमान्य टिळक, सावरकर वगैरे महापुरुषांची वीरता, देशप्रेम, त्याग वगैरेंचा इन्कार कुणीहि करू शकणार नाही. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात त्यांची

एक भूमिका होतीच होती. त्यांना आमचे शत-शत प्रणाम. देश त्यांचा ऋणी होता आणि राहिल.

गांधीजी आणि या महापुरुषांमध्ये जो फरक होता तो माझ्या मते खालीलप्रमाणे.

विज्ञानाचे पंख लावून अहिंसा आणि सत्याचे युग अवतरत होते. देशभक्तीच्या प्रेरणेने आणि भावनेने भारलेल्या टिळकांनी आणि वीर सावरकरांनी जो लढा दिला होता त्यासाठी त्यांना ब्रिटिशांनी अटक केली. त्यांच्यावर सरकारतर्फे राजद्रोहाचा आरोप ठेवण्यांत आला. त्या दोघांनीहि आपण तसे केले नसल्याचे निवेदन सादर करून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. अर्थात त्यांत ते निष्फळ ठरले आणि त्यांना तुरूंगवास भोगावा लागला. गांधींजीवर सुद्धा सरकारने राजद्रोहाचे खटले भरले. गांधीजींनी निवेदन देऊन स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला नाही. उलट त्यांनी सांगितले की याला जर आपण राजद्रोह म्हणत असाल तर तो मी केला आहे आणि आपण जर माझी सुटका कराल तर तो मी पुन्हा करीन. यासाठी मला शिक्षा करावयाची असेल तर जरूर करा. त्या वेळी जो इंग्रज न्यायाधिश होता तो गांधीजींच्या चरित्राने प्रभावीत झाला होता. त्याने गांधीजींचा संत म्हणून उल्लेख केला आणि अधिकाधिक असलेली म्हणजे सहा वर्षांची सजा त्यांना फर्मविली. आपल्या या निर्णयासाठी तो अत्यंत दुःखी झाला होता. हे कां घडले ?

त्याचे कारण असे असू शकेल की नवीन येणारे युग आपले स्वतःचे प्रश्न घेऊन अवतरत होते, त्यांची फोड करण्यासाठी जुन्या पुराण्यारिति-पद्धति उपयुक्त नव्हत्या. शठं प्रति शाठ्यम् -'' ''जशास तसे'' ही नीति आता चालण्यासारखी नव्हती. कुटनीतीचे प्रयोग करून त्याच्या परिणामांपासून स्वतःची सुटका करून घेण्याचे दिवस संपत आले होते. दुसरी गोष्ट म्हणजे धर्म आणि

संप्रदायाचा पाया विज्ञानाने डळमळीत करावयास सुरूवात केली होती. संप्रदायांसमवेत जोडण्यांत आलेल्या मायथॉलॉजी - पौराणिक कथा संबंधात समाजांत प्रश्न आणि शंका विचारल्या जाऊ लागल्या होत्या. केवळ हिंदुत्वाची गोष्ट संकुचित वाटू लागली होती. इतक्यांत गांधीजी आले. त्यांची ईश्वर - परायणता, धर्म - परायणता कुठल्याहि हिंदुपेक्षा कमी नव्हती, एवढेच नव्हे तर ते स्वतःला सनातनी हिंदु म्हणवून घेत, परंतु त्यासोबतच त्यांना सर्वधर्मांविषयी समभाव, सर्व धर्माच्या इष्ट देवतांबद्दल पूज्यभाव वाटत असे. स्वतःचे कोणतेहि काम ते प्रार्थनेनेच सुरू करत असत. त्यांची ही ईश्वर - परायणता ईश्वरार्पणतेची भावना सामान्य माणसाला चांगली समजत होती. बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठी विलायतेत गेले तेव्हा तेथे दोन ख्रिस्ति धर्मीयांच्या संपर्कात आले. ईस्लामचा पण थोडाफार परिचय झाला. त्यांच्या मनांत कितीतरी शंका उत्पन्न झाल्या होत्या त्याचे निराकरण श्रीमद् राजचंद्रजींनी केले. दक्षिण आफ्रिकेत गेले तेव्हा त्यांच्या प्रार्थनांमध्ये हिंदु धर्मासह ख्रिस्ती, ईस्लामी, पारसी धर्माच्या प्रार्थनांचा सुद्धा समावेश होता. एक व्यापक मानवधर्म त्यांच्या वाणीतून आणि आचरणांतून प्रकट होत होता. विज्ञान युगाची पहाट त्यातून साकारत होती. गांधीजींच्या या भूमिकेसमोर संकुचित हिंदुवाद टिकूच शकत नव्हता. हिंदुधर्माच्या ठेकेदारांना हे मुळीच मानवणारे नव्हते.

सोबत गांधीजींनी समाज सुधारणेचे कार्य सुरू केले. बालपणापासून त्यांना खटकणारी अस्पृश्यता, जात-पात, उच्च-नीचतेचे भेदभाव दूर करण्याचे काम सुरू केले. आपल्या आश्रमांत हरिजन कुटुंबांना आग्रहपूर्वक स्थान दिले. त्यांची सख्खी बहिण त्यामुळे आश्रम सोडून गेली. तिला जाऊ दिले. देणगीदारांनी देणग्या देणे थांबविले, आश्रम बंद पडण्याची वेळ येऊन ठेपली. तरीहि आपल्या सिद्धांतांशी ते अढळ राहिले. स्वतःच्या साथीदारांना हरिजन संबोधू लागले. देशभर हरिजन

यात्रा काढल्या. हरिजन आणि आदिवासींसाठी सेवक संघांची स्थापना केली. स्त्रीयांना घराबाहेर काढून त्यांच्यावर मोठमोठ्या जबाबदाऱ्या सोपविल्या आणि स्त्रीयांनी त्या पार सुद्धा पाडल्या. हिंदु धर्मांत ज्यांचे स्थान सर्वोच्च होते आणि धर्माबाबत ज्यांचा निर्णय अंतिम मानला जाई अशा धर्ममार्तंड धुरंधरांना गांधीजींचे हे वागणे सहन होणे शक्यच नव्हते. योगायोगाची गोष्ट म्हणजे लोकमान्य टिळक खास पूणेकर. वीर सावरकर सुद्धा महाराष्ट्रीयन. त्यांच्या वेळी गांधीजी भारतात आले. दक्षिण आफ्रिकेतल्या त्यांच्या कामाची माहिती देशवासीयांना ठाऊक होती. त्या साऱ्यांचा लाभ त्यांना मिळाला. देशांत आले तेव्हा त्यांच्याकडे तीन मोठी कामे होती. ती त्यांनी समर्थपणे पूरी केली.

१) दक्षिण आफ्रिकेत घेऊन जाण्यात येणाऱ्या गिरमिट्या - वेठबिगार मजूरांची प्रथा रोखण्याचे काम त्यांनी सरकारकडून मंजूर करून घेतले. २) वीरमगावची अत्यंत धिक्कार पावलेली जकात खिडकी काढली गेली. आणि ३) चंपारणातल्या खेडूतांवर नीळ मळ्यांच्या मालकांकडून होणाऱ्या अनन्वीत अत्याचारांपासून त्यांची मुक्तता करण्यांत त्यांना मिळालेले असाधारण यश. चंपारण्यातल्या कामाचे स्वरूप दक्षिण आफ्रिकेतल्या कामाच्या परंपरेतलेच होते.

त्यानंतरसुद्धा बारडोलीचा सत्याग्रह, खेडामधला सत्याग्रह, वायकोमचा सत्याग्रह, नागपूरचा झेंडा सत्याग्रह, अशा एका मागून एक सफलता लाभत गेल्या. आणि मग जालियनवाला बागेची घटना, रावीच्या तटावरून संपूर्ण स्वातंत्र्यासाठीचा काँग्रेसचा ठराव आणि शेवटी मिठाचा सत्याग्रह या साऱ्यांनी ब्रिटिश राजवटीचा पायाच हादरला.

हिंदू धर्मांच्या ठेकेदारांना हे सारे मानवणारे नव्हते. त्यांत पूणेरी धर्मधुरीणांनी पेशवाईच्या काळांत सत्तेचा स्वाद चाखला होता. अशा रितीनें धर्मसत्ता आणि राजसत्ता दोहोंच्या अहंकाराला गांधीजींनी चाप लावला होता. त्यांच्यामध्ये

गांधीजींविरूद्धचा द्वेष उफाळून येत होता. पण गांधीजींची विजयीपताका ते रोखू शकत नव्हते. त्यांच्यासाठी गांधीजी डोळ्यांतल्या कुसासारखे होते. कोणत्याहि रितीनें ते गेले तर आपले वर्चस्व त्यांना पुन्हा स्थापन करता येणार होते. यासाऱ्यांत गोडसे पुन्हा पुन्हा ठासून सांगतो की गांधीजी आपल्या शेवटच्या क्षणी ''हे राम'' बोललेच नाहीत. एवढ्या लहान दिसणाऱ्या घटनेला तो एवढे महत्व कां देतो ? कारण ''राम'' तर त्याची मत्तेदारी होती. गांधीजी रामभक्त होते हे सिद्ध झाले तर ते त्याला कसे मानवेल ? खरी गोष्ट अशी होती की गांधी जोपर्यंत जीवंत होते तो पर्यंत साऱ्या जनतेवरील त्यांचा प्रभाव आणि पकड दूर करणे शक्यच नव्हते. त्यासाठी एकच मार्ग होता. कोणत्याहि रितीनें गांधीजींचा कांटा काढणे.

हे आहे गांधीजींच्या हत्येपाठील पूणेरी षडयंत्राचे कारण.

आणखीहि अनेक कारणें घडली. भोळ्या पोरा टोरांची मने कलुषीत केली गेली. खोट्या गोष्टी पसरवून मुसलमानांविरूद्ध हिंदुच्या मनांत वैर भावना निर्माण केली गेली. मुसलमानांना जवळ करून राष्ट्राच्या मुख्य प्रवाहांत त्यांना आणण्याचे महात्मा गांधीजींचे प्रयत्न म्हणजे मुलसमानांची खुषामत असे हिंदु तरूणांना वाटू लागले होते व ते गांधीजींचे कडवे विरोधक बनतील असे प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात होते. असे असले तरी खूपच थोडे तरूण त्या मार्गाने गेले. पण हत्येसाठी तर त्यातला एक जण सुद्धा पुरेसा होता. त्या एकाची पूर्ति गोडसेने केली.

**प्रश्न :** आखणी एका शंकेचे निरसन करून घेतो. गांधीजी कोणत्याही गोष्टीसाठी हिंदुंना ज्या प्रमाणे धारेवर धरत असत तसे मुसलमानांना धरत नसत असा एक आक्षेप आहे. याबाबत काय सांगाल ?

**उत्तर :** गांधीजी स्वतःला सनातनी हिंदु समजत असत आणि स्वकीयांशी बोलावे तसे सर्वांशी आत्मियतने बोलत असत. कुणाला धारेवर धरण्याचा त्यांचा स्वभाव

नव्हता, पण केव्हातरी रागाने बोलून जात. पुर्णाहुति मधून घेतलेले खालील लिखाण पहा :

''दुसऱ्या दिवशी दिल्लीत खूप मौलवी भेटण्यास आले होते. त्यांनी सांगितले की, आपल्या निवेदनानुसार मुसलमानांना सांगण्यात आले आहे. गांधीजींनी त्यांना खडसावले, ही तर केवळ धोकाबाजी आहे. तुमचे हृदय परिवर्तन झाल्याचे हे लक्षण नाही. मौलवींनी सांगितले की, आपल्या आगमनामुळे स्थानिक मुसलमानामध्ये ''मोठा फेरफार'' होत आहे. आम्हाला आशा वाटते की ''शहरांत थोड्याच काळांत संपूर्ण शांततेचे वातावरण होईल.''

त्यांच्या अतिशयोक्तिपूर्ण आणि आडवळणाच्या बोलण्याने गांधीजींना दुःख वाटले ते त्यांच्यावर अक्षरशः कडाडले ''तुम्हाला तुमच्याबद्दलच विश्वास वाटत नाही, मुसलमानांची हृदये पूर्णपणे साफ झाली नाहीत तर माझे इथे राहणे निरर्थक आहे.''

१९४७ च्या डिसेंबरातल्या शेवटच्या आठवड्यांत प्रार्थना प्रवचनांत गांधीजी म्हणाले : मुस्लीम अल्पसंख्यांना माझे सांगणे आहे की त्यांनी जहालपणा सोडून दिला पाहिजे, तुमच्याबद्दल अन्य धर्मिय लोकांच्या मनांत जी अढी आहे ती खोटी पाडा आणि जगाला दाखवून द्या की, तुमचे हृदय साफ आहे. हिंदुस्तानचा वफादार नागरिक बनणे हाच हिंदच्या राज्यसंघात इज्जत आणि अब्रूनें राहण्याचा सरळ रस्ता आहे ......''

''माझ्याकडे कित्येक मुसलमानांनी तक्रार केली आहे की ते हिंदुविरोधी आहेत अशा केवळ शंकेने त्यांना कामावरून कमी करण्यांत आले आहे. या लोकांबद्दल मला सहानुभूति वाटते मात्र त्यांच्यावर संशय धरला जात असला तरी त्यांनी मनांत कटूता धरता कामा नये असे माझे त्यांना सांगणे आहे.''

पाकिस्तांनात ज्या घटना घडत होत्या त्यावर त्यांचे बारकाईने लक्ष होते. भारतांतल्या मुसलमानांनी आपले वर्तन कसे ठेवावयास हवे याबद्दल ते म्हणतात,

''कित्येक मौलवींनी पोलिसांबाबत ते पक्षपात करत असल्याची तक्रार केली असून, आपल्याशिवाय आणखी कुणाचा आधार नसल्याचे म्हटले आहे.'' त्यांना गांधीजींनी सांगितले, : ''राष्ट्रवादी मुसलमानांच्या वतीने मी लढत आहे, तेव्हा तुम्ही मला मदत करावयास हवी. हिंदुस्तानांतल्या मुस्लीम जनतेला सरळ पणाने वागण्याचे आपण आवाहन कराल तर त्याच्या परिणामी हिंदु आणि शीख जनतांसुद्धा सरळ रस्त्यावर येईल. पाकिस्तान हिंदुस्तानाला युद्धाची धमकी देत असतांना तुम्ही त्याचा विचार करावयास हवा. पाकिस्तान करतेय ते बरोबर आहे असे जर आपणास वाटत असेल तर मला कांहीच म्हणावयाचे नाही. परंतु ते चूक करते आहे असे जर तुम्हाला वाटत असेल तर त्याचा निषेध निःसंदीग्ध शब्दांत तुम्ही करावयास हवा.''

११ जानेवारी रोजी त्यांना कित्येक राष्ट्रवादी मौलवी भेटण्यास आले होते. पाकिस्तानांत जायची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. आणि इथल्या कलुषीत वातावरणांला ते कंटाळले होते. तक्रारीच्या स्वरांत आपल्याला इंग्लंडला पाठवून द्या असे त्यांनी गांधीजींना सांगितले. त्यांच्या सांगण्यावर गांधीजींनी ठपका ठेवला, आणि सायंकाळी प्रार्थना प्रवचनात आपले विचार मांडले, ''पाकिस्तानात मुसलमानांना खूळ लागले आहे, म्हणून ते तिथून हिंदूंना आणि शीखांना हाकलून लावत आहेत. इथल्या हिंदुंनी सुद्धा तसेच कृत्य केले तर त्यांचा स्वतःचाच विनाश होईल.

१३ जानेवारीला उपोषणाला सुरूवात करण्यापूर्वी त्यांनी म्हटले, ''दुनियेतल्या तमाम धर्मांच्या लोकांना समान हक्क आणि मालमत्तेची सुरक्षितता

पाकिस्तान देत नसेल आणि हिंदुस्तानचे सरकारसुद्धा त्यांचे अनुकरण करत असेल तर विनाश अटळ आहे.''

त्याच दिवशी वृत्त आले की हिंदु आणि शीख निराश्रीतांना घेऊन येणाऱ्या ट्रेनवर मुसलमानांनी हल्ला करून मोठ्या प्रमाणांत कत्तल केली. या वृत्तानें दुःखी झालेल्या गांधीजींनी सायंकाळच्या प्रार्थना - प्रवचनांत सांगितले : ''संघ (भारत) सरकार हे कोठवर सहन करू शकेल ? मी उपवास करीत असलो तरी हिंदु आणि शीख जनता कोठवर धीर धरू शकेल ? पाकिस्तानने या गोष्टींना पायबंद घातलाच पाहिजे.'' अशा अनेक गोष्टी गांधीजींनी भारत आणि पाकिस्तानांत चालू असलेल्या रक्तपाताविषयी त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत सांगितल्या आहेत. ज्यांना या गोष्टीचे प्रामाण्य हवे त्यांनी प्यारेलालजी कृत ''महात्मा गांधी पूर्णाहुति'' अवश्य पहावा.

* * * * *

# आरोपनामा

हिंदुत्ववाद्यांचे खोट्या अफवा पसरविण्याचे काम तर सातत्याने सुरूच असते. स्वामी विवेकानंद, सुभाषबाबू, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद वगैरे शहीद हिंदुत्ववादी होते असे ठसविण्याचा त्यांच्या प्रयत्न असतो. वरिलपैकी एकही जण हिंदुत्ववादी नव्हता, तरी सातत्यपूर्वक प्रचाराने ही गोष्ट जनमानसांत ठसविण्याचे प्रयत्न चालू असतात. अशीच आणखी एक गोष्ट म्हणजे सरदार पटेल यांना हिंदुत्ववादी आणि हिंदुधार्जिणे म्हणून रंगवण्याचा प्रयत्न. खालील दोन अवतरणे सरदार पटेलांच्या पत्रांमधून घेण्यांत आली आहेत :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आर. एस. एस.) आणि हिंदू महासभा त्यांतही विशेषतः संघाची कार्यवाही व त्यामुळे देशभरांत जे वातावरण निर्माण झाले त्यामुळेच गांधीजींच्या खूनाची घटना घडली असे आम्हाला मिळालेल्या अहवालावरून स्पष्ट होते. गांधीजींच्या खूनाच्या कटांत हिंदुमहासभेतल्या जहाल विचारवादी गटाचा पण सहभाग होता. याबाबत माझ्या मनांत तिळमात्रसुद्धा शंका नाही. (सरदार वल्लभभाई पटेल यांनी डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांना लिहिलेल्या पत्रातून "सरदार पटेल्स कॉरस्पॉन्डन्स," खंड ९, पान ३२३)

"संघ नेत्यांची भाषणे जातीय वादाच्या विषाने भरलेली असतात. संघाच्या चिथावणीनेच महात्मा गांधींची हत्या झाली आहे. संघाच्या लोकांनी गांधीजींचा खून झाल्यानंतर मीठाई वाटून आनंद व्यक्त केला आहे." (सरदार वल्लभभाई पटेल यांनी सर-संघचालक श्री. गोलवलकर गुरुजींना ११ सप्टेंबर १९४८ रोजी लिहिलेल्या पत्रामधून)

महात्मा गांधी आणि आचार्य विनोबाजींचे निकट सहकारी ज्येष्ठ सर्वोदयी नेते आदरणीय श्री. चुनिभाई वैद्य यांच्या श्री. प्रकाश न. शाह यांनी घेतलेल्या मुलाखतीवर आधारीत ''सूरज सामे धूळ'' या मूळ गुजराती भाषेंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तिकेचा मराठी भाषेंत अनुवाद करण्याची संधि देऊन डॉ. उषाबेन महेता यांनी माझ्यावर मोठाच विश्वास दाखविला. चुनिभाईंचा बाज आणि गुजराती भाषेचा सुगंध कायम ठेऊन भाषांतर करण्याचा हा प्रयत्न वाचकांना भावल्यास त्याचे संपूर्ण श्रेय या तिघांना. मात्र त्यांत अपयश आल्यास ते निःसंदिग्धपणे अनुवादकाचेच.

- मेघश्याम तु. आजगांवकर